दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा क्रः तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२२-२३/२०२२/४५८४ दिनांक : ३०.०९.२०२२

30 SEP 2022

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याबाबत..**

संदर्भ : १) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२२-२३/२०२२/४१४८ दिनांक ०१.०९.२०२२
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/२४४ दिनांक २९.०९.२०२२.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजनांकरीता बनविण्यात आलेल्या **महाडीबीटी पोर्टलद्वारे** (संकेतस्थळ- www.mahadbtmahait.gov.in) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात,

**१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.**
**२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना.**
**३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना**

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता,** डीबीटी पोर्टल नोंदणीकृत असणा-या (Registered Institute) संस्थांना, संस्थांची माहिती (Institute Profile) अद्ययावत करण्यासाठी डीबीटी पोर्टल दिनांक ११.०८.२०२२ पासून सुरु करण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक १ मधील परिपत्रकान्वये, संस्थांची माहिती अद्ययावत करण्यासाठी सूचित करण्यात आले आहे.

महाडीबीटी पोर्टलवर प्रदर्शित केल्यानुसार, **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता**, डीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांचे अर्ज (नवीन/नुतनीकरण) भरण्याची प्रक्रिया **दिनांक २१.०९.२०२२ पासून** सुरु केलेली आहे. (सोबत डीबीटी पोर्टल स्क्रीनशॉट जोडला आहे)

या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेत शिकणा-या व उपरोक्त योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज (नवीन/नुतनीकरण) लवकरात लवकर भरुन घ्यावेत, तसेच संस्था स्तरांवर प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता, संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करुन तात्काळ निकाली (मंजूर/नामंजूर) काढावेत.

**महत्वाची सूचना**

१. संस्थांनी डीबीटी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी असलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करावी.
२. संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.

३. विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व महाराष्ट्र शासनाच्या (DBT Portal) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्था प्रमुखांनी स्वतः योग्य ती दक्षता घ्यावी. संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले अर्ज संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित राहील्यास **किंवा**

४. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन-दोन शिष्यवृत्ती योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही शिष्यवृत्ती योजनांचा) लाभ प्राप्त करुन घेतल्यास **किंवा**

५. संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास **किंवा**

६. संस्थेमध्ये TFWS अंतर्गत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

**(डॉ. दि. व्यं. जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे